**स्व. बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारकाचे पहिल्या टप्प्यातील स्थापत्य काम ६५ टक्के पूर्ण**

**माहिती आणि तंत्रज्ञान संबंधित करण्यात येणाऱ्या दुसऱ्या टप्प्यातील कामाला लवकरच सुरूवात**

**झाडांचे संवर्धन करण्यासाठी डिझाइन मध्ये थोडेफार बदल**

**मुंबई, २३ जानेवारी, २०२३:**

**स्व. बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक जुन्या महापौर बंगल्यात आकार घेत असून त्याची ६५ टक्के स्थापत्य कामे पूर्ण झाली आहेत.**

बाळासाहेब ठाकरे स्मारक हे जुन्या महापौर बंगल्याचा वारसा आणि पावित्र्य जतन करून त्यामध्ये नवीन संग्रहालय उभारले जात आहेत. या स्मारकामध्ये टप्पा-१ अंतर्गत प्रवेशद्वार इमारत, प्रशासकीय इमारत, कुंड इमारतीचे बांधकाम करणे व महापौर निवासस्थान इमारतीचा सांस्कृतिक ठेवा जतन करुन या इमारतीचे संग्रहालयामध्ये रुपांतरीत करणे तसेच सभोवतालच्या परीसराचे सुशोभिकरण करणे इत्यादी प्रमुख शाश्वत आणि ऊर्जा कार्यक्षम संरचनांचा समावेश आहे. तर दुसऱ्या टप्प्यात माहिती व तंत्रज्ञान संदर्भातील म्हणजे हार्डवेअर आणि सहाय्यभूत सेवा, तंत्रज्ञान, लेझरशो, डिजिटल मॅपिंग प्रोजेक्शन, कथा/ गोष्टी सांगणे, चित्रपट, व्हर्चुअल रियालटी, ऑडिओ व्हिजुअल आणि तांत्रिक घटक इत्यादीचा समावेश असेल.

अत्याधुनिक बांधकाम तंत्रज्ञानाचा वापर करून  हरित अनुपालन करणाऱ्या वास्तूची समुद्रानजिक निर्मिती केली जात आहे, जी मूळ  इमारतीचा वारसा जपते आणि तिला अत्याधुनिक देखील बनवते. या स्मारकाचा जास्तीत जास्त भाग हा भूमिगत आहे, ज्यामध्ये अत्याधुनिक संग्रहालय, वस्तूसंग्रह, सभागृह, बफर टाकी, भूमिगत टाकी, सांडपाणी प्रक्रिया संयंत्र आणि पावसाच्या पाण्याची साठवण टाकी इ. चा समावेश आहे. स्थापत्य कामे ६५ टक्के  पूर्ण झाली असुन उर्वरीत कामे जलदगतीने प्रगतीपथावर आहे. तसेच लवकरच माहिती आणि तंत्रज्ञानाशी संबंधित असलेल्या कामांना  सुरवात केली जाणार आहे.

**"स्व. बाळासाहेब ठाकरे स्मारकाचे बांधकाम करणे ही प्राधिकरणासाठी आदराची बाब आहे. बांधकामादरम्यान अडथळा ठरणाऱ्या सुमारे २३० जुन्या आणि मोठ्या अशा सर्वच झाडांचे जतन करण्यासाठी एमएमआरडीएने डिझाइन मध्ये बदल केले आहे. या स्मारकाची रचना अशी करण्यात आली आहे की स्मारकाला भेट देत असताना अरबी समुद्राच्या विहंग दृश्यांचाही आनंद घेतला जाऊ शकतो. या स्मारकाची क्षमता एकावेळी १००० लोकांची असेल." असे एमएमआरडीएचे महानगर आयुक्त श्री. एस. व्ही.आर. श्रीनिवास भा. प्र.से., म्हणाले.**


MAYOR'S BUNGALOW
3
2
INTERPRETATION CENTER
1
ENTRANCE BLOCK